


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक २२८, रविवार १७ ऑगस्ट २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पेट्रोलपंपाच्या अमिषाखाली २३ लाखांना गंडा

## ● लोणीमावळा येथील तरूणाची फसणूक ; पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल
## ● इंडियन ऑईलच्या खोट्या कागदपत्रांद्वारे विश्वास संपादन

**लोणीमावळा : प्रतिनिधी**

ऑनलाईन पध्दतीने पेट्रोलपंप डिलरशिप मिळवून देतो असे आमिष दाखवत, इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या नावाने बनावट कागदपत्रे पाठवून अमोल राजाराम तुपे वय ३३ रा. लोणीमावळा या तरूणांची तब्बल २३ लाख ४३ हजार ९०० इतक्या प्रचंड रकमेची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तरूणाने सुरूवातीस सायबर क्राईम विभागाकडे तक्रार दाखल करून आरोपीविरोधात कठोर कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर पारनेर पोलीस ठाण्यात शर्मा नावाच्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





### कठोर कारवाई करून न्याय द्या

*फिर्यादी अमोल ठुबे यांनी तक्रारीत नमूद केले आहे की,शर्मा नावाच्या व्यक्तीने इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे नाव वापरून बनावट सही व शिक्क्यांची कागदपत्रे पाठवली, संगणकीय साधनांचा दुरूपयोग करून आर्थिक व्यवहार केले आणि वेळोवेळी विश्वास संपादन करून लाखो रूपये हडप केले. त्यामुळे संबंधित व्यक्तीविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करून पीडीतास न्याय मिळावा अशी मागणी करण्यात आली आहे.*

### घटना कशी घडली ?

*मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात फिर्यादी अमोल तुपे हे त्यांच्या कृषि सेवा केंद्राच्या दुकानामध्ये असताना मित्रासोबत झालेल्या चर्चेत पेट्रोलपंप वाटपाबाबत एका वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द झाल्याची माहीती समोर आली. त्यावर विश्वास ठेऊन अमोल तुपे यांनी १५ मे रोजी आपल्या बहिणीच्या नावाने इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या अधिकृत वेबसाईटवर अर्ज दाखल केला. दुसऱ्याच दिवशी १६ मे रोजी ९३५६९३७७२० या मोबाईल नंबरवरून एका व्यक्तीचा फोन आला. स्वतःचे नाव शर्मा असे सांगणाऱ्या व्यक्तीने स्वतः ला इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमध्ये डिलरशिप मॅनेजर म्हणून ओळख करून दिली. हिंदी भाषेत संभाषण करताना त्याने तुम्हारा अर्ज मंजूर हो गया है, ई मेल चेक करो असे सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन केला.*

### लाखोंचा गंडा

*सुरूवातीस नोंदणी फी उकळण्यात आल्यानंतर शर्मा नावाच्या व्यक्तीने वेळोवळी फोन, व्हॉट्सप आणि ई मेलद्वारे संपर्क ठेवून वेगवेगळया कारणांनी पैशांची मागणी केली. २१ मे ते १६ जुलै या कालावधीत एकूण २३ लाख ४३ हजार ९०० इतकी रक्कम फिर्यादी तुपे यांच्याकडून उकळली गेली. ही रक्कम एचडीएफसी बँक, कॅनरा बँक, क्सीस बँक, इंडसण्ड बँक, बंधन बँक व पुन्हा एचडीएफसी बँकेच्या विविध खात्यांवर घेण्यात आली. ही सर्व खाती मुंबईच्या बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स शाखेतील असल्याचे दिसून येते.*

### फसवणूक कशी उघडकीस आली ?

*१९ जुलै रोजी फिर्यादी तुपे यांनी शर्मा नावाच्या व्यक्तीला पुन्हा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्याचे दोन्ही मोबाईल नंबर बंद होते. त्यानंतर तुपे यांचा फसवणूकीचा संशय बळावला. अखेर २३ जुलै रोजी पीडीत अमोल तुपे यांनी सायबर क्राईमच्या पोर्टलवर तक्रार नोंदविली. पुढे शर्मा याच्याविरोधात पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.*

### बनावट कागदपत्रांचा सुळसुळाट

*अर्ज मंजुर झाल्याचे सांगण्यात आल्यानंतर फिर्यादी तुपे यांना एका ई मेलवरून पेट्रोल पंप रजिस्ट्रेशन लेटर, अलॉटमेंट सर्टिफिकेट, डिलरशिप लायसन्स असे अधिकृत भासणारे दस्तऐवज पाठवण्यात आले. त्यासाठी सुरूवातीस ३५ हजार ५०० रूपये नोंदणी फी म्हणून मागवले गेले. ही रक्कम गुगल पेद्वारे एचडीएफसी बँकेच्या खात्यावर जमा करण्यात आली.*

### नागरिकांना सावधानतेचा इशारा

*ही घटना नागरिकांसाठी धोक्याची घंटा ठरली आहे. सरकारी कंपन्यांच्या नावाने येणाऱ्या ऑनलाईन जाहिराती व कॉल्सवर लगेच विश्वास ठेवू नये. अधिकृत बेबसाईट आणि स्थानिक कार्यालयांमार्फत पडताळणी करावी, न पडताळलेल्या खात्यावर पैसे जमा करू नयेत. सायबर गुन्हेगार नागरिकांचा विश्वास संपादन करण्यासाठी बनावट कागदपत्रे, मेल आयडी आणि मोबाईल नंबर वापरून मोठया प्रमाणात गंडा घालत असल्याचे यावरून स्पष्ट झाले आहे.*

# भाजपात निष्ठेची उपेक्षा !

- बाहेरून आलेल्या बगलबच्चांना बढती
- जिल्हा कार्यकारणी बरखास्त करण्याची मागणी
- स्टॅम्प पेपरवर प्रदेशाध्यक्षांकडे पाठविले निवेदन
- उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पाटच्या अहिल्यानगर दक्षिण जिल्हा कार्यकारणीच्या ताज्या नियुक्त्या पक्षातच वादाच्या विषय ठरत आहेत. अनेक वर्ष रक्त, घाम गाळणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून, इतर पक्षातून आलेल्या आणि राजकीय मृत्यू झाल्यानंतर भाजपाच्या आश्रयाला आलेल्या

उर्वरीत पान ३ वर

### निष्ठावंत दुय्यम, बगलबच्चांचा सन्मान

*कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार ही जिल्हा कार्यकारणी म्हणजे सच्चा भाजपा कार्यकर्त्यांची नाही, तर जातीवादी आणि विषारी मानसिकततून तयार झालेली काही स्वार्थी लोकप्रतिनिधींच्या लाचार बगलबच्चांची फळी आहे. ज्यांनी पक्षासाठी ३० ते ४० वर्षे आपले आयुष्य समर्पित केले, त्यांना बाजूला सारण्यात आले, तर इतर पक्षातून आलेल्या संधीसाधू लोकांना तातडीने स्थान देण्यात आले असा आरोप कार्यकर्त्यांनी केला आहे.*

### स्टॅम्प पेपरवर सात पानी अहवाल सादर

*या मागणीसाठी भाजप कार्यकर्त्यांनी थेट स्टँप पेपरवर सात पानी निवेदन तयार करून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना पाठविले आहे. यात पक्षाची स्थापना झाल्यापासून आजावर पक्षाशी प्रामाणिक राहिलेल्या कार्यकर्त्यांचा तपशील देण्यात आला आहे. दशकानुदशके पक्षासाठी आपले तारूण्य, वेळ, पैसा आणि कष्ट अर्पण करणाऱ्यांना केवळ गटबाजी व जातीवादाच्या राजकारणामुळे डावलण्यात आले, असा ठपका या निवेदनात ठेवण्यात आला आहे.*

# हिवरेबाजारने घातला देशाच्या ग्रामविकासाचा पाया

**हिवरेबाजार : प्रतिनिधी**

देशाच्या ग्रामविकासाचा पाया हिवरे बाजारने घातला आहे. या गावाने शाश्वत विकासाचे आदर्श मॉडेल घडवले. सन १९९७ साली पहिला आदर्श गावाचा पुरस्कार हिवरे बाजारला देण्याचा मान मला मिळाला होता ही बाब आज पुन्हा आठवतेय. आजही हे गाव लोकसहभाग, श्रमदान व पर्यारण संवर्धनाच्या चळवळीमुळे देशाला दिशा देत असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

हिवरे बाजार हे नाव म्हणजे आदर्श ग्रामविकासाचे प्रतीक आहे. ग्रामस्थांच्या श्रमदान, लोकसहभाग आणि शाश्वत विकासाच्या वाटेवर चालणारे हे गाव आज देश-विदेशासाठी मार्गदर्शक ठरले

उर्वरीत पान ३ वर



- पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे प्रतिपादन
- एक वृक्ष मातेसाठी, एक वृक्ष देशासाठी
- ग्रामस्थांचा पर्यावरणपूरक संकल्प

### ज्ञानोबा-तुकाराम सभागृह

*या सोहळ्यात गावातील जिल्हा परिषद शाळेसाठी ग्रामस्थांनी श्रमदानातून उभारलेल्या ज्ञानोबा-तुकोबा सभागृहाचे उद्घाटन मंत्री विखे यांच्या हस्ते पार पडले. हे सभागृह विद्यार्थ्यांना अभ्यास, सांस्कृतिक उपक्रम व गावातील लोकसभा घेण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.*

# भारतीय कांदा बांगलादेशला जाणार

## आयातबंदी उठविल्याने शेतकऱ्यांना अल्पसा दिलासा

**निफाड : प्रतिनिधी**

भारतीय कांद्याचा सर्वांत मोठा ग्राहक असलेल्या बांगलादेशाने कांद्यावरील आयातबंदी उठविल्याने स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला कांदा उत्पादक शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे गेल्या तीन महिन्यांपासून ठप्प झालेल्या कांदा निर्यातीला आता पुन्हा चालना मिळणार आहे.



बांगलादेश सरकारने तेथील आयातदारांना भारतीय कांद्याच्या आयातीसाठी परवाना देण्यास

उर्वरीत पान ३ वर

### दराचे चित्र सोमवारी स्पष्ट होणार

*भारतातील एकूण कांदा निर्यातीपैकी तब्बल ४० टक्के हिस्सा बांगलादेशकडून खरेदी केला जातो. २०२४-२५ या आर्थिक वर्षात ४.८० लाख मेट्रिक टन कांदा बांगलादेशला पाठविण्यात आला होता. त्याद्वारे १,७२४ कोटी रुपयांचे परकीय चलन मिळाले होते. दरम्यान, १५ ऑगस्ट तसेच काही बाजार समित्या शनिवारी व रविवारी बंद राहणार असल्यामुळे कांद्याच्या दरासंदर्भातील खरे चित्र सोमवारीच स्पष्ट होणार आहे.*

# ...तर मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही!

- मनोज जरांगे यांचा सरकारला इशारा
- मराठा समाजाचा संघर्ष अखंड सुरू राहणार

**हिंगोली : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाज आता थेट मुंबईत मोर्चा काढणार असल्याचे हिंगोली येथील पत्रकार परिषदेत मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केले. त्यांनी इशारा दिला की, या आंदोलनात एखाद्या तरुणाला काठी लागली तर मराठा समाज मुख्यमंत्र्यांसह मंत्री व आमदारांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही.

जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी ही न्यायासाठी सुरू असलेली लढाई आहे. राज्यातील सर्व मराठा बांधव मुंबईत धडकणार आहेत, मात्र नागरिकांना त्रास होऊ देणे आमचा उद्देश नाही. मराठा समाजाचा आरक्षणासाठीचा संघर्ष सर्वांसाठी फायदेशीर ठरेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी ओबीसी आणि मराठा समाजामध्ये निर्माण होणाऱ्या वादांवरही भाष्य केले.

आपण एकाच गावात राहतो, एकमेकांच्या सुखदुः खात सहभागी होतो. त्यामुळे वाद करून घ्यायचा नाही. इतर समाजांनी मदत मागितली तर त्यांच्या समस्येसाठीही आंदोलन केले जाईल, असे त्यांनी सांगितले.

फडणवीस यांच्या पोलीस पाहणीबाबतच्या वक्तव्यावर जरांगे पाटील यांनी प्रत्युत्तर दिले की, आम्हाला धमकी देऊ नये. आंदोलनात एका तरुणालाही काठी लागली तर राज्यभरातील मराठा समाज मुख्यमंत्र्यांसह मंत्री व आमदारांना फिरणे बंद करेल, तसेच फडणवीस यांचे राजकीय आयुष्य उध्वस्त होईल.

### राज्यासाठी फडणवीस घातक



*फडणवीस राज्यासाठी घातक आहेत. निवडणुकीपूर्वी कर्जमाफीची आश्वासने दिली पण पूर्ण केली नाही. मोठे पक्ष फोडले, आता छोटे पक्ष संपवले जात आहेत. त्यामुळे राज्यातील छोटे पक्ष सावध राहावे.* ***मनोज जरांगे पाटील***

# पुण्यात राष्ट्रवादीची स्वबळाची भाषा !

## ● कार्यकर्त्यांना थेट सूचनाय ● महायूतीत मिठाचा खडा ?

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले असून संघटनेला बळ देण्याचा प्रयत्न करत आहेत. पुण्यात राष्ट्रवादीच्या नव्या कार्यालयाचे आज उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेले राष्ट्रवादीचे नेते आणि खासदार प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पुण्यात स्वबळावर लढण्याचे संकेत देत कार्यकर्त्यांना थेट सूचना दिल्या आहेत.

प्रफुल्ल पटेल म्हणाले की, पुणे हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे येथे ऑफिस असणे खूप



गरजेचे होते. म्हणूनच अजित पवार आणि पार्थ पवार यांनी लक्ष घालून हे ऑफिस उभे केले आहे. आपण आता महायुतीत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत जिथे शक्य असेल तिथे जरूर युती करावी, पण जिथे शक्य नाही तिथे परिस्थिती पाहून निर्णय करावा. मैत्रीपूर्ण लढती झाल्या तरी चालतील, पण केवळ तिकिट मिळाले नाही म्हणून आपला कार्यकर्ता दुसऱ्या पक्षात जायला नको.

दरम्यान, प्रफुल्ल पटेल यांनी असा देखील मत व्यक्त केला, मतचोरीचा आरोप करून राहुल गांधी महाराष्ट्राला बदनाम करत आहेत. विरोधक हे गोबेल्स नीतीचा अवलंब करून लोकांना मतचोरीचा मुद्दा पटवून देऊ पाहत आहेत, त्याला आपण प्रत्युत्तर दिले पाहिजे.

स्वबळावर लढण्याविषयी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही आपली भूमिका स्पष्ट केली. आज शहराच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन झालं आहे. प्रचंड राजकीय इच्छा शक्ती असलेला आमचा पक्ष आहे. राज्यात आम्ही महायुती म्हणून लढणार आहोत, मात्र अनेक शहरातील राजकीय परिस्थिती वेगवेगळी आहे. त्यामुळे याबाबत राज्याचे तीन नेते अंतिम निर्णय घेतील, असे तटकरे म्हणाले.

### एकला चलो रे चा नारा

*पुण्यात आपण १६२ जागांची तयारी केली पाहिजे, असा ठाम दावा करत खा. प्रफुल्ल पटेल यांनी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी एकला चलो रे' चा नारा दिला आहे. पटेल यांच्या या वक्तव्यामुळे महापालिकेतील आगामी राजकीय समीकरणांवर चर्चा रंगली आहे. स्वबळावर निवडणुकीची तयारी करण्याचा संदेश दिल्याने इतर पक्षांच्या गोटातही हालचाली सुरू झाल्या आहेत.*


# गरजू शेतकऱ्यांसाठीच कर्जमाफी

## सरसकटची तयारी नाही; महसूलमंत्र्यांचे वक्तव्य

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्यात गेल्या काही दिवसांपासून शेतकरी कर्जमाफीची चर्चा जोर धरत आहे. राज्यभरातील शेतकऱ्यांकडून कर्जमाफीची मागणी होत असून, विरोधी पक्ष सातत्याने सरकारला घेरत आहेत. माजी आमदार बच्चू कडू यांच्याकडून विविध शहरांमध्ये मोर्चा काढला जात आहे.**

राज्य विधीमंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनातही विरोधकांनी सरकारला प्रश्न विचारला होता, कर्जमाफी कधी करणार? यावर सरकारने सांगितले की, कर्जमाफीबाबत अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली असून, ती समिती अहवाल सादर केल्यानंतरच निर्णय घेतला जाईल.



यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सूचक वक्तव्य केले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, सरसकट कर्जमाफी होणार नाही, फक्त गरजू शेतकऱ्यांसाठीच कर्जमाफी केली जाईल. बावनकुळे म्हणाले, फार्म हाऊस आणि बंगले बांधणाऱ्यांना कर्जमाफी कशाला?

बावनकुळे यांच्या म्हणण्यानुसार, राज्य सरकार गरीब शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीसाठी तयारी करत आहे, मात्र त्यासाठी कोणते निकष असतील, ते अद्याप ठरलेले नाहीत.

त्यांनी पुढे सांगितले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधीमंडळात घोषणा केली की, महाराष्ट्रात अशा शेतकऱ्यांची कर्जमाफी व्हावी ज्यांना खरी गरज आहे. एखादा शेतकरी बंगला बांधतो किंवा फार्म हाऊस बांधतो, त्याला कर्जमाफी कशासाठी?

### सर्व्हेक्षण करूनच कर्जमाफी

*ज्या गरीब शेतकऱ्याच्या शेतात काही पिकत नाही, ज्याने कर्ज उचलले आहे आणि जो आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलण्याच्या संकटात आहे, अशा शेतकऱ्यांसाठी व्यक्तीगत सर्वेक्षण करून कर्जमाफी केली जाईल.*

***चंद्रशेखर बावनकुळे,*** *महसूलमंत्री*

# चंदेरी

## बाळासाहेब ठाकरे यांचा नातू गाजवणार बॉलीवूड


बाळासाहेब ठाकरे यांचा नातू ऐश्वर्य ठाकरे लवकरच बॉलीवूडमध्ये पदार्पण करणार आहे. त्याच्या आगामी चित्रपटाचे पहिले पोस्टर समोर आले आहे. यात तो महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार आहे. लोकप्रिय दिग्दर्शक अनुराग कश्यप यांच्या आगामी चित्रपटात तो दिसणार आहे. 'नीशांची' असे या चित्रपटाचे नाव आहे.

चित्रपटाची निर्मिती अजय राय व रंजन सिंह यांनी केली आहे. हा चित्रपट येत्या १९ सप्टेंबरला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या चित्रपटाची चर्चा होती. 'नीशांची' या चित्रपटात ऐश्वर्य ठाकरेसह वेदिका पिंटो, मोनिका पानवार, मोहम्मद झिशान आयुब आणि कुमुद मिश्रा हे कलाकार झळकणार आहेत. या चित्रपटाचे पहिले पोस्टर पाहिल्यानंतर सोशल मीडियावर प्रेक्षकांनी याची तुलना अनुराग कश्यपच्या 'गॅंग्स ऑफ वासेपूर', 'गुलाल' आणि 'मुक्केबाझ' यांसारख्या चित्रपटांशी केली आहे. 'नीशांची' चित्रपटाबद्दल अनुराग कश्यपने सांगितलेलं की, आम्ही २०१६ मध्ये या चित्रपटाची कथा लिहिली होती, तेव्हापासून मी यावर चित्रपट बनवण्याच्या विचारात होतो. नीशांची हा चित्रपट प्रेम, क्राईम, शिक्षा, छळ यावर आधारित आहे.

## स्मृती इराणी सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्री

### दीपिका पादुकोणलाही टाकलं मागे

**एकेकाळी 'क्योंकि सास भी कभी बहू थी' ही मालिका प्रचंड गाजली होती. यातील सर्वच कलाकारांनी प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण केलं आहे आणि ते अजूनही कायम आहे. अशातच आता या हिट मालिकेचा दुसरा भागही प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या मालिकेनिमित्त 'तुलसी' फेम अभिनेत्री स्मृती इराणी यांनी छोट्या पडद्यावर दमदार पुनरागमन केलं आहे.**




गेल्या काही वर्षांत स्मृती इराणी राजकारणात सक्रिय होत्या. त्यामुळे त्यांनी कलाक्षेत्रातून काही काळ ब्रेक घेतला होता. मात्र, सध्या स्मृती इराणी तुलसी विराणीच्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आल्या आहेत. त्यांच्या 'क्योंकि सास भी कभी बहू थी २' या मालिकेने अवघ्या काही दिवसांतच रेकॉर्ड मोडले आहेत, त्याचबरोबर स्मृती इराणी यांनीसुद्धा कमाईबाबत मोठा विक्रम केला आहे. त्या टीव्ही इंडस्ट्रीतील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्री ठरल्या आहेत. स्मृती इराणी प्रत्येक एपिसोडसाठी तब्बल १४ लाख रुपये घेत आहेत. यामुळे त्यांनी 'अनुपमा' मालिकेच्या प्रत्येक एपिसोडसाठी ३ लाख रुपये घेणाऱ्या रुपाली गांगुली, तसंच दोन लाखांपर्यंत मानधन घेणाऱ्या हिना खान यांनाही मागे टाकलं आहे. याबाबत स्मृती इराणी म्हणाल्या, जो व्यक्ती सातत्याने चांगली कामगिरी करतो, ज्यामुळे त्या मालिकेची टीआरपी वाढते, त्याला योग्य मोबदला मिळायलाच हवा. माझं मानधन हे अशा प्रकारच्या व्यावसायिक दृष्टीकोनाचं उदाहरण आहे आणि हे सगळं सहजासहजी मिळालेलं नाही, यामागे खूप मेहनत आहे. 'क्योंकि सास भी कभी बहू थी २'चे १५० एपिसोड प्रसारित होणार आहेत. त्यामुळे या मालिकेमधून स्मृती इराणी तब्बल २१ कोटी रुपये कमावणार आहेत. यामुळे मानधनाबाबत त्यांनी बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पदुकोणलाही मागे टाकलं आहे. शाहरुख खानबरोबरच्या 'पठान' चित्रपटासाठी दीपिकाला एकूण १५ कोटी रुपये मानधन मिळालं होतं. नव्या भागामध्ये स्मृती इराणी आणि अमर उपाध्याय मुख्य भूमिकेत असून, त्यांच्यासह हितेन तेजवानी, गौरी प्रधान, रोहित सुचांती, शगुन शर्मा, अमन गांधी, तनिषा मेहता, अंकित भाटिया आणि प्राची सिंग यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. सध्या मालिकेला प्रेक्षक चांगलाच प्रतिसाद देत आहेत. जुन्या पिढीसह आजच्या पिढीमधील प्रेक्षकांनासुद्धा ही मालिका आवडत आहे.

## अजय-काजोलचा गोव्यात आलिशान व्हिला, एका रात्रीचं भाडं ७५ हजार रुपये

**चित्रपटांमध्ये अभिनय करण्याव्यतिरिक्त, काही कलाकार व्यवसाय करण्यासाठीदेखील प्रसिद्ध आहेत. त्यांचे खूप मोठे व्यवसाय आहेत. बॉलीवूडचे कपल अजय देवगण आणि काजोल हे हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात लोकप्रिय चेहऱ्यांपैकी एक आहेत. हे जोडपे मुंबईत शिवशक्ती नावाच्या त्यांच्या बंगल्यात राहतात. ज्याची किंमत ६० कोटी रुपये आहे. गेल्या अनेक वर्षांपासून चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या या जोडप्याने बरीच संपत्ती जमवली आहे.**

या जोडप्याचे लंडनमध्येदेखील एक आलिशान घर आहे. उत्तर गोव्यात त्यांचा एक आलिशान व्हिला आहे, ज्याला त्यांनी व्हिला एटरना असे नाव दिले आहे. काजोल आणि अजय गोव्यात त्यांच्या सुट्टीत जातात. या जोडप्याने ही मालमत्ता गेस्टसाठीदेखील खुली केली आहे. व्हिला एटरना अतिशय आलिशान पद्धतीने सजवलेला आहे. हा व्हिला उत्तर गोव्यातील मोइरा गावाजवळ आहे. हा व्हिला पोर्तुगीज स्टाईलमध्ये बांधला गेला आहे आणि त्यात सर्व मॉडर्न सुविधा आहेत. तुम्ही व्हिलामध्ये प्रवेश करताच, तुमचे स्वागत प्रथम एका मोठ्या स्विमिंग पूलद्वारे केले जाते. हे घर स्विमिंग पूलभोवती बांधलेले आहे. व्हिला हिरव्यागार झाडांनी वेढलेला आहे आणि रहिवाशांना एकांतदेखील मिळतो. स्विमिंग पूलजवळ एक लॉन आहे जो हिरवळीने भरलेला आहे, त्यात एक बागदेखील आहे. लॉनच्या शेजारी, घरामध्ये शंभर वर्षे जुनी विहीरदेखील आहे. व्हिलामध्ये पाच बेडरूम आहेत आणि प्रत्येक खोली वेगळ्या स्टाईलमध्ये बांधलेली आहे. सर्व खोल्या आरामदायी आणि सुंदर आहेत आणि लाकडी बेड आणि सोफे आहेत. प्रत्येक खोलीतून हिरव्यागार लॉन आणि स्विमिंग पूलचे सुंदर दृश्य दिसते. या व्हिलामध्ये





एक मोठा डायनिंग एरियादेखील आहे. हा व्हिला जितका मोठा दिसतो तितकाच तो सुंदर आणि सुसज्ज आहे. हा व्हिला बाहेरून जितका सुंदर दिसतो तितकाच तो आतूनही सुंदर आहे. यात एक मोठा वॉटर वॉल फाउंटन आहे, जो समुद्रकिनाऱ्यासारखा अनुभव देतो आणि पाण्याचा आवाज त्याला शांत वातावरण देतो. तर एटरनाचे एका रात्रीचे भाडे सुमारे ७५,००० हजार रुपये आहे.

## आमिरने ४ आलिशान फ्लॅट्स दिले भाड्याने

**बॉलीवूड अभिनेता आमिर खान कुठल्या न कुठल्या कारणाने प्रेक्षकांमध्ये चर्चेचा विषय ठरत असतो. अशातच आता तो सध्या चर्चेत आलाय ते त्याने भाड्याने दिलेल्या त्याच्या फ्लॅट्समुळे. अभिनेत्याचे मुंबईत अनेक फ्लॅट्स असून, त्यासाठी त्याने आकारलेल्या भाड्याची रक्कमही बरीच मोठी आहे.**

आमिर खानचे मुंबईतील वांद्रे परिसरात विरगो सोसायटीमध्ये अनेक फ्लॅट्स आहेत. सध्या त्या इमारतीचे काम सुरू असल्याने अभिनेता दुसरीकडे राहत आहे. तो राहत असलेल्या इमारतीचे नूतनीकरण करून तिथे आलिशान फ्लॅट्स बांधण्याचं डेव्हलपरचं नियोजन असल्याचे म्हटले जात आहे. अहवालानुसार या इमारतीत आमिर खानचे तब्बल १२ फ्लॅट्स आहेत. आमिर खान सध्या राहतो त्याच परिसरात शाहरुख खानचेही घर आहे. त्याच्या मन्नत या आलिशान बंगल्याचे काम सुरू असल्याने तो सध्या वांद्रे येथील पूजा कासा इमारतीत राहत आहे. आमिर खानने वांद्रे येथील त्याचे ४ आलिशान अपार्टमेंट्स भाड्याने दिले असून, दर महिन्याला तो त्या भाड्यांतून २४.५ लाख इतकी रक्कम मिळवत आहे. त्याने ४५ महिन्यांचा हा करार केला आहे. २०२५ ते २०३० अशा कालावधीत त्याचे अपार्टमेंट्स त्याने भाड्याने दिले आहेत. या करारात १.४६ कोटींची सुरक्षा ठेवसुद्धा समाविष्ट आहे; तर स्टँप ड्युटीसाठी चार लाख व रजिस्ट्रेशनसाठी २,००० अशी रक्कम आहे. त्याशिवाय या अपार्टमेंट्सचे भाडे दरवर्षी पाच टक्क्यांनी वाढणार असल्याचेही ॲग्रीमेंटमध्ये नमूद करण्यात आले आहे. माध्यमांच्या माहितीनुसार काही दिवसांपूर्वी शाहरुख खाननेही वांद्रे येथील पूजा कासा इमारतीत दोन ड्युप्लेक्स अपार्टमेंट भाड्याने घेतले होते. ज्याचे वर्षाचे एकूण भाडे २.९ कोटी इतके आहे. पूजा कासा येथील हे अपार्टमेंट अभिनेता जॅकी भगनानी, त्याची बहीण दीपशिखा देशमुख व वडील निर्माते वाशू भगनानी यांच्या नावे आहेत.

## ५०० रुपये घेऊन मुंबईला आलेला अभिनेता २४ कोटींचा मालक

**सुनील ग्रोव्हर याने नुकताच ४८ वा वाढदिवस साजरा केला. कधी डॉ. मशहूर गुलाटी, कधी गुत्थी, तर कधी रिंकू भाभी या भूमिकेत लोकांना हसवणारा सुनील प्रत्येक भूमिकेत इतक्या चांगल्या प्रकारे उतरतो की, पडद्यावर स्त्रीच्या भूमिकेत दिसणारा हा अभिनेता प्रत्यक्षात पुरुष आहे याची कल्पनाही तुम्ही करू शकत नाही. सुनील ग्रोव्हरने विनोदी अभिनयातून खूप मोठे यश मिळवले आहे; परंतु त्या यशामागील इंडस्ट्रीतील त्याचा प्रवास सोपा नव्हता. प्रेक्षकांमध्ये आपली ओळख निर्माण करण्यापूर्वी, त्याला अनेक वेळा नकाराचा सामना करावा लागला.**



हरियाणाच्या सिरसा जिल्ह्यातील मंडी डबवाली या छोट्याशा गावात राहणारा सुनील ग्रोव्हर प्रत्येक अभिनेत्याप्रमाणे मोठी स्वप्ने घेऊन मुंबईत आला होता. तो अमिताभ बच्चन आणि शाहरुख खान यांचे चित्रपट पाहत मोठा झाला आणि येथूनच त्याच्यात अभिनयाची आवड निर्माण झाली. जेव्हा तो मुंबईत आला तेव्हा त्याच्या खिशात फक्त ५०० रुपये होते. त्याला एक वर्ष काम मिळाले नाही आणि त्यामुळे त्याची सर्व बचत या एक वर्षात खर्च झाली. अनेक नकारांना तोंड दिल्यानंतर त्याला एका शोची ऑफर मिळाली. त्याने त्यात तीन दिवस काम केले; परंतु तीन दिवसांनंतर त्याला अचानक एका रात्रीत काढून टाकण्यात आले. शोमधून काढून टाकण्याचे कोणतेही कारण देण्यात आले नाही. नंतर हळूहळू त्याला काम मिळू लागले. पण तो महिन्याला जेमतेम ५०० रुपये कमवू शकत होता. समस्या इतकी गंभीर झाली होती की, त्याला जेवणही परवडत नव्हते. अशा परिस्थितीत कपिल शर्माचा शो सुनील ग्रोव्हरच्या कारकिर्दीला कलाटणी देणारा ठरला. कपिलच्या शोने सुनील ग्रोव्हरला रातोरात स्टार बनवले. गुत्थी आणि डॉ. मशहूर गुलाटी यांच्या भूमिकांमुळे तो घराघरात लोकप्रिय झाला. विनोदाबरोबरच सुनील ग्रोव्हरने अनेक प्रकारच्या चित्रपटांमध्ये काम केले आहे आणि विनोदी कलाकार असण्यापलीकडे त्याने गंभीर भूमिकांमध्येही स्वतःला सिद्ध केले आहे. 'गब्बर इज बॅक', 'जवान', 'भारत', 'बागी' व 'गुड बाय' मध्ये या भूमिका त्याने खूप गंभीरपणे साकारल्या. स्वतःच्या बळावर इंडस्ट्रीत नाव कमावलेला सुनील ग्रोव्हर आज कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचा मालक आहे. तो कॉमेडी शोमधील एका एपिसोडसाठी २५ लाख रुपये घेतो. त्याचे मुंबईत एक आलिशान घर आहे, ज्याची किंमत सुमारे २.५ कोटी रुपये आहे. त्याच्याकडे अनेक आलिशान गाड्या आहेत. तो एका इन्स्टाग्राम पोस्टसाठी ५-१० लाख रुपये घेतो. त्याची एकूण संपत्ती सुमारे २४ कोटी रुपये आहे.

## तेजस्वी म्हणाली, मी टक्कलही करेल!

**तेजस्वी प्रकाश हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आजवर तिने अनेक मालिकांमध्ये मुख्य भूमिका साकारत प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. हिंदीसह मराठीतही काम केलं आहे. अशातच आता तिने एका मुलाखतीत भूमिकेसाठी तिची काहीही करण्याची तयारी असल्याचं म्हटलं आहे. भूमिकेसाठी मी टक्कलही करू शकते, असे ती म्हणाली.**



जर एखाद्या भूमिकेसाठी गरज भासली तर मी टक्कलदेखील करायला तयार आहे. मी अशा गोष्टींसाठी तयार असते. इंडस्ट्रीत सगळ्यांनी प्रत्येक गोष्टीसाठी इतक्या वेगवेगळ्या पर्यायांचा शोध घेतलाय, मग ते केसांचा रंग वेगळा दाखवायचा असो, टक्कल दाखवायचं असो किंवा सोनेरी रंगाचे केस दाखवायचे असो. पण, अजूनतरी प्रत्यक्षात कोणी मला हे करायला सांगितलं नाही; पण कधी जर सांगितलं तर मी नक्कीच ते करेन, असे ती म्हणाली. तेजस्वी ही हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय चेहरा असून तिने आजवर 'स्वरागिनी', 'रिश्ते लिखेंगे हम नये', 'सिलसिले बदलते रिश्तों का', 'थपकी प्यार की', 'कसम', 'पेहरेदार पिया की', 'संस्कार', 'कर्ण संगीनी', 'ससुराल सिमर का', 'नागीन ६', 'सेलिब्रिटी मास्टर शेफ', 'खतरो कें खिलाडी', 'बिग बॉस' यांसारख्या मालिकांमध्ये व रिॲलिटी शोमध्ये काम केलं आहे. तेजस्वी प्रकाशने मराठीतही काम केलं आहे. तिने 'स्कूल कॉलेज आणि लाईफ', 'मन कस्तुरी' यांसारख्या चित्रपटांत काम केलं आहे. तिच्या खासगी आयुष्याबद्दल बोलायचं झालं तर सध्या ती अभिनेता करण कुंद्रासह रिलेशनशिपमध्ये आहे.

## दुर्दैवी चित्रपट : शूटिंगदरम्यान दोन अभिनेत्यांसह दिग्दर्शकाचा मृत्यू!

**बॉलीवूडमध्ये असे काही चित्रपट आहेत, ज्यांचा प्रवास खूप दुःखद आणि गूढतेने भरलेला आहे. आज आम्ही तुम्हाला अशा चित्रपटाबद्दल सांगणार आहोत, जो बनवण्यासाठी २३ वर्षे इतका प्रदीर्घ कालावधी लागला. या चित्रपटाबद्दल सर्वांत आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे तो बनवताना त्याचे दोन मुख्य कलाकार आणि दिग्दर्शक यांचे निधन झाले. त्यामुळे हा चित्रपट बॉलीवूडमधील सर्वांत दुर्दैवी चित्रपट मानला गेला.**

या चित्रपटाची कथा आणि त्याच्याशी संबंधित घटना ऐकून सर्वांनाच धक्का बसला आहे. एकीकडे चित्रपटात कलाकारांचे समर्पण दिसते; तर दुसरीकडे प्रत्येक वळणावर मृत्यूची सावली दिसते. त्याहूनही धक्कादायक म्हणजे हा चित्रपट अनेक वेळा थांबवण्यात आला आणि नंतर पुन्हा तो सुरू करण्यात आला; पण प्रत्येक वेळी काही ना काही अपघात झाला. अखेर हा चित्रपट कसातरी पूर्ण झाला आणि तो मोठ्या पडद्यावर आणण्यात आला. या चित्रपटाचे नाव 'लव्ह अँड गॉड' होते, ज्याला काही लोक 'कैस और लैला' म्हणूनही ओळखतात. या चित्रपटाचे चित्रीकरण पहिल्यांदा १९६३ मध्ये सुरू झाले होते. त्यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक के. आसिफ होते आणि प्रसिद्ध अभिनेते गुरु दत्त यांना मुख्य भूमिकेत घेण्यात आले होते. लैलाच्या भूमिकेसाठी निम्मीची निवड करण्यात आली होती. पण, १९६४ मध्ये गुरु दत्त यांचे अचानक निधन झाले आणि हा चित्रपट अपूर्ण राहिला. त्यांच्या निधनानंतर चित्रपटाचे चित्रीकरण थांबले. गुरु दत्त यांच्या निधनानंतर दिग्दर्शक के. आसिफ यांनी हा चित्रपट बंद केला. काही वर्षांनी त्यांनी चित्रपट पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला आणि संजीव कुमार यांना मुख्य भूमिकेत घेतले. त्यानंतर १९७० मध्ये चित्रपटाचे चित्रीकरण पुन्हा सुरू झाले; परंतु याच काळात चित्रपटाचे दिग्दर्शक के. आसिफ यांचेही निधन झाले. हा त्यांच्या कारकिर्दीतील पहिला आणि शेवटचा अपूर्ण चित्रपट आहे. ते त्याचा रिलीज पाहू शकले नाहीत. चित्रपटाचे दिग्दर्शक के. आसिफ यांच्या निधनानंतर चित्रपटाचे चित्रीकरण पुन्हा एकदा थांबले. चित्रपट बराच काळ अपूर्ण राहिला. त्यानंतर त्यांच्या पत्नी अख्तर आसिफ यांनी तो पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी चित्रपट निर्माते के. सी. बोकाडिया यांच्या मदतीने चित्रीकरण पूर्ण केले. चित्रपटाचे काही भाग तीन वेगवेगळ्या स्टुडिओंमध्ये चित्रित करण्यात आले. जेव्हा सर्व काही तयार झाले, तेव्हा १९८५ मध्ये संजीव कुमार यांचे निधन झाल्याची आणखी एक वाईट बातमी आली. अशा प्रकारे हा चित्रपट बनवण्यासाठी २३ वर्षे लागली. सतत होणाऱ्या अपघातांमुळे त्याला बॉलीवूडच्या दुर्दैवी चित्रपटाचा दर्जा मिळाला. पण, सर्व अडचणी आणि दुःखांनंतर हा चित्रपट अखेर २७ मे १९८६ रोजी प्रदर्शित झाला. प्रेक्षकांसाठी हा चित्रपट केवळ एक प्रेमकथा नव्हता, तर त्यामागे लपलेला संघर्ष आणि शोकांतिकाही तितकीच खोल होती. या चित्रपटात त्याच भावना दिसतात, ज्या दिग्दर्शकाला तो बनवताना दाखवायच्या होत्या.



## मानसी पारेखला निर्मात्यानं लग्नाची घातली होती भीती!

**अभिनय क्षेत्रात कलेसह सौंदर्याला, दिसण्यालाही महत्त्व असतं. अभिनेत्रींच्या बाबतीत तर बऱ्याचदा त्यांना त्यांच्या दिसण्यावरून कामं दिली जातात, असं म्हटलं जातं. लोकप्रिय अभिनेत्री मानसी पारेख हिने याबद्दलचा तिचा अनुभव सांगितला आहे. तिला लग्न केलं तर काम मिळणार नाही, असंही सांगण्यात आलं होतं. ती हिंदी व गुजराती चित्रपटात काम करते.**



मानसीने सांगितलं, की मी लग्न करणार होते तेव्हा एका निर्मात्यानं मला सांगितलं, की लग्न करू नकोस. जाड होशील. मग तुला कोणी काम देणार नाही. पण, माझं असं मत होतं की, लग्नानंतर मी जाड का होईन? कारण- आताही मी काम करीत आहे आणि गेल्या २० वर्षांपासून या इंडस्ट्रीत काम करतेय. मानसीला आठ वर्षांची एक मुलगी आहे. ती म्हणाली, की मी एक आई आहे आणि तरीही मी काम करीत आहे. त्यामुळे लोकांनी सांगितलेल्या गोष्टी योग्य आहेत की नाही मला माहीत नाही. कदाचित त्या असतीलही; पण मी मला हवं तसंच आयुष्य जगणार आहे. मी फक्त करिअर करत राहणार नाहीये. मला आयुष्यात दोन्ही गोष्टी हव्या आहेत. मानसीने गायक पार्थिव गोहिलसह लग्न केलं आहे. नवऱ्याबद्दल ती म्हणाली, की मला योग्य जोडीदार मिळाला आहे. पार्थिवसह लग्न केल्याचं मला समाधान आहे. तोसुद्धा एक कलाकार आहे. तो मला समजून घेतो. आई झाल्यानंतर माझी चित्रपटांतील कारकीर्द सुरू झाली. त्यामुळे आता असे कोणतेही नियम नाहीयेत आणि ती एक खूप चांगली गोष्ट आहे. मानसी एक अभिनेत्री व निर्माती आहे. तिनं हिंदी व गुजराती चित्रपटांत काम केलं आहे.

## शॉर्ट न्यूज

### बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

■ **श्रीरामपूर :** तालुक्यातील हरेगाव फाटा येथे रात्री स्प्रिंकलर पाहण्यासाठी शेतात गेलेल्या मुकेश गणपत पवार (वय अंदाजे ४०) या शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला केला. दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक झडप घालून पवार यांच्या पाठीवर पंजा मारला. प्रसंगावधान राखत पवार यांनी प्रतिकार केल्याने ते बचावले. या हल्ल्यात पवार जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी शासकीय उप जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### उद्योजकाकडून ६ लाखांची खंडणी

■ **नगर :** एमआयडीसीतील एका नामांकित कंपनीचे काम सुरू ठेवण्यासाठी आणि वर्क ऑर्डर मिळत राहण्यासाठी धमक्या देऊन उद्योजकाकडून तब्बल ६ लाख रुपये उकळल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी स्वराज्य कामगार संघटनेचे अध्यक्ष योगेश गलांडे आणि सचिव दत्तात्रय तापकिरे यांच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे दोघे उद्योजकाला कामात अडथळा आणण्याची आणि धमक्या देत होते, असे तक्रारीत म्हटले आहे.

### खेळाडू वृत्तीने जीवनाचा सामना करा

■ **लोणी :** येथे १७ वर्षे मुलींचा राज्यस्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप २०२५ स्पर्धेचे उद्घाटन करताना जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर खेळालाही प्राधान्य देऊन जिद्दीने खेळातून करीअर घडवण्याचे आवाहन केले. प्रवरामध्ये क्रीडा सुविधांचा सातत्याने विस्तार होत असून खेळाडू वृत्तीने जीवनाचा सामना करण्याचे महत्त्व त्यांनी सांगितले.

### गोदावरी कालव्यांना पाणी सोडा

■ **कोपरगाव :** माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे गोदावरी कालव्यांना तातडीने ओव्हरफ्लोचे पाणी देण्याची मागणी केली आहे. दीड महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने आणि उन्हाचा चटका वाढल्याने खरीप पिके धोक्यात आली आहेत. वेळेवर पाणी न मिळाल्यास शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे.

### सरपंचाच्या गाडीवर विद्यार्थ्यांचा चिखलफेक

■ **शेवगाव :** तालुक्यातील नवीन दहिफळ गावच्या महिला सरपंच सविता शिंदे यांच्या गाडीवर शालेय विद्यार्थ्यांनी रस्ता मिळत नसल्याने चिखलफेक केली. नवीन दहिफळ ते ढोर हिंगणी हा शिव रस्ता अनेक वर्षांपासून रखडलेला आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर प्रकरण उघडकीस आले. महिला सरपंचाने हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

### आ.खताळांच्या हस्ते धांदरफळला ध्वजारोहण

■ **संगमनेर :** धांदरफळ येथील श्री. बी. जे खताळ जनता विद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यांनी राष्ट्रध्वजाला वंदन करून, स्वातंत्र्यलढ्यातील वीरांना अभिवादन केले आणि उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात अहिंसा, कायदेभंग, बहिष्कार, उपोषण, मोर्चे व स्वदेशी आंदोलन यांसारख्या मार्गांचा अवलंब करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करण्यात आले.

# संविधान व लोकशाही अमृत महोत्सव वर्षभर राबवणार

## सचिन नगरे यांची माहिती; संविधान अमृत महोत्सव अभियान प्रारंभ



पारनेर : प्रतिनिधी

**संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल वर्षभर संविधान अमृत महोत्सव अभियान राबवण्यात येणार असल्याचे संविधान व लोकशाही अमृत महोत्सव अभियानचे प्रमुख सचिन नगरे यांनी सांगितले.**

या अभियानांतर्गत पारनेर शहरात स्वातंत्र्याच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त संविधान व लोकशाही जागर समिती पारनेरच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारनेर येथे झेंडावंदन करण्यात आले. यावेळी शाळेतील मुलींना संविधानाविषयीची छोटी माहिती पुस्तिका वाटप करून संविधानाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

### अण्णांचे आशीर्वाद

*ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची राळेगण सिद्धी येथे जाऊन संविधान व लोकशाही जागर समिती पारनेरच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली व त्यांचे आशीर्वाद मिळवले. यावेळी स्वातंत्र्य दिनानिमित्त तरुणांना संविधान व लोकशाही संदर्भात मार्गदर्शन घेण्यात आले.*

पारनेर तहसील कार्यालयात झालेल्या झेंडावंदन कार्यक्रमादरम्यान आमदार काशिनाथ दाते, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत चेडे, तहसीलदार गायत्री सौंदाणे, नायब तहसीलदार दीपक कारखिले, किसवे यांच्या उपस्थितीत नागरिकांना संविधानाची माहिती पुस्तिका वाटून जनजागृती करण्यात आली.या कार्यक्रमास संविधान व लोकशाही जागर समिती पारनेरचे पदाधिकारी सचिन नगरे, पत्रकार विनोद गोळे, दादा शेटे, नियाज राजे, संतोष भोर, सतीश म्हस्के, सुनील गाडगे, किरण कुबडे, विजय उमाप आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## वाचकांच्या लेखणीतून

### वृत्तपत्र : समाजशिक्षणाचे व्यापक क्षेत्र

शाळा, महाविद्यालये ही शिक्षणाची माध्यमे आहेत. परंतु वृत्तपत्रे हीसुद्धा शिक्षणाची व्यापक क्षेत्रे आहेत. त्यांचे लोकशाही राष्ट्रांत विशेष स्थान असते. म्हणूनच त्यांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले गेले आहे.

स्वदेशीय लोकांमध्ये विलायती विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा, आणि या (हिंदुस्थान) देशाची समृद्धी व एथील लोकांचे कल्याण यांविषयी स्वतंत्रतेने व उघड रीतीनें विचार करावयास स्थल व्हावें.... या इच्छेने बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठीत दर्पण नावाचे पाक्षिक वर्तमानपत्र ६ जानेवारी १८३२ रोजी सुरु केले. हे पाक्षिक मराठी व इंग्रजी अशा द्वैभाषिक स्वरूपात छापले जाई. इंग्रजशाहीविरुद्ध काही विचार यात नाहीत ना, यावर लक्ष ठेवण्यासाठी धूर्त इंग्रज राज्यकर्त्यांनी ही सोय करून ठेवलो होती. तशाही स्थितीत जांभे करांनी ते वर्तमानपत्र आठेक वर्षे चालवून दाखविले हे विशेष! तो मराठी वृत्तपत्र सृष्टीचा आरंभकाळ होता. मराठी भाषेला नीट आकार मिळाला नव्हता. या पत्रातील भाषा ओबडधोबड असली तरी ती समजून घेतली पाहिजे. मराठी भाषेला डौलदारपणा येण्यासाठी विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेचा उदय व्हावा लागला. पुढे केसरी, मराठा, विजयी मराठा, मूकनायक, बहिष्कृत भारत, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, सकाळ आदी वृत्तपत्रांचा जन्म झाला आणि मराठी वृत्तपत्रसृष्टीचा जम बसत गेला. आज आपल्या मराठीत अनेक वृत्तपत्रे निघत आहेत. अगदी ग्रामीण भागातही त्यांनी प्रवेश केला आहे.

आता मोबाईलचा जमाना आल्याने ग्रंथवाचन आणि वृत्तपत्रवाचन हा प्रकारच मागे पडत चालला आहे. याचे वैषम्य वाटते. लोकहितवादींची शतपत्रे, केसरी, निबंधमाला, सुधारक या पत्रांनी एक काळ समाज हलवून सोडला होता. एवढी ताकद या वृत्तपत्रांत असते. म्हणून तर वृत्तपत्रांना बृहत्तर जिव्हा (मोठी जीभ) म्हणतात.

वृत्तपत्रे समाजशिक्षणाचे मोठे आणि व्यापक साधन आहे. सर्व प्रकारच्या वाचकांचे हित यात जोपासलेले असते. साहित्य, राजनीती, अर्थकारण, आरोग्य, खेळ इत्यादी सर्वांचा त्यात समावेश आढळेल. म्हणून वृत्तपत्रांचे स्थान आपण ओळखले पाहिजे. त्यांना धनाने आणि मनाने उदार आश्रय दिला पाहिजे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहिल्यानगर

# आदर्श परंपरेला लोकमनातल्या उपक्रमाची जोड

## श्रावणी चौथा मंगळवाराचा एक स्तुत्य उपक्रम

रांधे : प्रतिनिधी



**श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी ग्रामदैवत रांधुबाई मातेचा उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्याची परंपरा रांधे गावात गेली अनेक दशके चालत आली आहे. या परंपरेनुसार गावातील विविध आडनावांवरून (बाराभाई) जबाबदाऱ्यांची विभागणी होत असून प्रत्येक मंगळवारी ठरावीक घराणे उत्सवाचे नियोजन करते.**

सकाळी देवीला अभिषेक, मांडव-डहाळे, दुपारी संगीत-भजन, सायंकाळी देवीस साडी-चोळी, रात्री छबिना मिरवणूक व त्यानंतर करमणुकीचे कार्यक्रम. अशी उत्सवाची परंपरागत शृंखला आजतागायत सुरु आहे. यंदा चौथा श्रावणी मंगळवार बाराभाईच्या जबाबदारीत आला होता. परंपरेत करमणुकीच्या कार्यक्रमाचा समावेश असतो, मात्र यंदा गावकऱ्यांनी वेगळा निर्णय घेतला. जनमानसाच्या भावनांना प्राधान्य देत व गावाच्या सौंदर्यात भर घालण्याच्या उद्देशाने आम्ही रांधेकर असे डिजिटल नाव प्रवेशद्वारावर स्थापित करण्याचा अभिनव उपक्रम राबवण्यात येणार आहे.

### लोकार्पण सोहळा

*मंगळवारी सकाळी दहा वाजता आम्ही रांधेकर या डिजिटल नावाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. गावच्या प्रवेशद्वारावरच मान्यवरांचे स्वागत करणारे हे आकर्षक शिलालेख उभारण्यात आल्याने गावकऱ्यांच्या मनात अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या उपक्रमामुळे रांधे गावाचे वेगळेपण अधोरेखित झाले असून परंपरा व आधुनिकता यांचा सुंदर संगम घडला आहे.*

# डी.बी.एम.शाळेत देशभक्तीचा जल्लोष !

## अण्णा हजारे यांच्या हस्ते ध्वजारोहण; ७९वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

राळेगणसिद्धी : प्रतिनिधी

**डी.बी.एम. शाळेत १५ ऑगस्ट रोजी ७९ वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी पद्मश्री डॉ. अण्णा हजारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. 'भारत माता की जय' व 'वंदे मातरम'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.**

कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात ६ वीच्या विद्यार्थ्यांचा 'स्टोरी ऑफ सोल्जर्स' डान्स आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले पिरॅमिड व नृत्यप्रयोग प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवून गेले.



### 'ऑपरेशन सिंदूर 'विशेष आकर्षण

*सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात देशभक्तीपर गीताने झाली ज्याने प्रेक्षकांच्या मनात देशप्रेमाची लहर निर्माण केली. 'सुजलाम सुफलाम' आणि 'मेड इन इंडिया' या देशभक्तीपर नृत्याविष्कारांना उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात भरभरून दाद दिली. इतिहासाला उजाळा देणारे ७ वीच्या विद्यार्थ्यांचे 'राणी अहिल्याबाई' नाटक, ३ रीच्या विद्यार्थ्यांचे 'स्वातंत्र्यसैनिक' नाट्य, तसेच प्रभावी ठरलेले 'ऑपरेशन सिंदूर' नाटक विशेष आकर्षण ठरले.*

या सोहळ्यात मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून रामभाऊ माने ,जयसिंग भा. मापारी, राळेगण सिद्धीचे सरपंच जयसिंग सदाशिव मापारी, विठ्ठल थेऊरकर , 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेले सैनिक सागर मापारी, तसेच नुकतीच १०० किलोमीटर धावण्याची मॅरेथॉन पूर्ण करणारे माजी सैनिक ज्ञानेश्वर मापारी उपस्थित होते.

या वेळी इयत्ता ८ वीच्या स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकलेले विद्यार्थी, मंथन परीक्षेत यश मिळवलेले विद्यार्थी, अबॅकस चॅम्पियन विद्यार्थी तसेच इयत्ता १० वीतील प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थिनीचा सत्कार बँक ऑफ महाराष्ट्र, राळेगणसिद्धीचे प्रमुख किरण आवारी व डेप्युटी मॅनेजर राकेश कुमार सिंग यांच्या हस्ते करण्यात आला. या सत्कारामुळे कार्यक्रमाला आणखी प्रेरणादायी स्वरूप लाभले.

विशेष म्हणजे, ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त कार्यक्रमाची सांगता सर्वांनी मिळून गायलेल्या 'पसायदान'ने करण्यात आली, ज्यामुळे वातावरण भक्तिरस, संस्कृती आणि एकात्मतेने भारावून गेले.हा बहारदार कार्यक्रम विद्यालयाच्या प्राचार्या शितल मापारी यांच्या कल्पनेतून व नेतृत्वाखाली नर्सरी ते अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून सादर करण्यात आला. संपूर्ण पंचक्रोशीतील विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्यात मदत केली.

शाळेचे संस्थापक व अध्यक्ष जे. डी. मापारी यांनी यावेळी सांगितले,विद्यार्थ्यांमधील देशप्रेम, कला आणि सामाजिक जाण अशा कार्यक्रमांमुळे अधिक वृद्धिंगत होते. हीच खरी शिक्षणाची खरी उंची आहे.

# मुलिकादेवी विद्यालय म्हणजे शैक्षणिक मंदिर

## सचिन पाटील वराळ यांचे प्रतिपादन; स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांचा सन्मान

निघोज : प्रतिनिधी



**मुलिकादेवी विद्यालयातील गुणवंत शिक्षकांमुळे गावाचा नावलौकिक राज्यभर झाला असून हे विद्यालय एक शिक्षण मंदिर झाले असल्याचे प्रतिपादन जनसेवा फाऊंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी व्यक्त केले.**

१५ ऑगस्ट रोजी विद्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य अंकुश अवघडे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

यावेळी विविध स्पर्धांत नैपुण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. वराळ पाटील, प्रा. किरण पाडळकर, स्कूल कमिटीचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य भास्करराव वराळ पाटील, मेजर विकास वराळ, राहुल वराळ आणि विलास हारदे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. या प्रसंगी सचिन पाटील वराळ म्हणाले की, प्राचार्य अंकुश अवघडे आणि त्यांच्या सर्व शिक्षक सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन देऊन उच्च दर्जाचे शिक्षण दिले. त्यांच्या अथक परिश्रमांमुळेच मुलिकादेवी विद्यालय राज्यात प्रसिद्ध झाले आहे. कार्यक्रमाला विद्यालयाचे उपप्राचार्य कैलास मोकळे, पर्यवेक्षक लक्ष्मण झंजाड, शिक्षक सबाजी बेलोटे, सुधीर धानापुणे, भास्कर काकडे, महेबूब इनामदार, अरुण काळे, धनंजय खोसे, सुनील औटी, श्रीमती पुष्पा वराळ, संगीता दिघे, अनिता काळे, ज्योती पोटे, प्रिया लहारे, बालिका सोनवणे, अनिल हारदे, राहुल भालेकर, गणेश बारामते, दारकू खोडदे, अमोल खिलारी, शिवाजी गुंजाळ, सुनताज इनामदार, बाबाजी शिंदे, दादासाहेब ठवाळ तसेच शिक्षकेतर कर्मचारी सुधाकर शेळके, भाऊसाहेब लामखडे, पूनम शिंदे आदींसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबाजी शिंदे सर यांनी केले तर आभारप्रदर्शन स्कूल कमिटीचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील यांनी मानले.

### गुणवंत विद्यार्थी

*सानिका रमेश पवार, आदित्य नवनाथ लाळगे, स्वराज सत्यवान लंके, अलिया मेहबूब इनामदार, अलिना इलियास मोमीन, प्रांजल दिगंबर लाळगे, लावण्या गणेश भुकन, कार्तिकी संतोष पठारे, तेजल रोहिदास काळे आदी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.या सर्वांनी तालुका, जिल्हा तसेच राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये यश संपादन करून विद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे.*



# रिमझिम पावसाने खुलविले सोहळ्याचे सौंदर्य!

## इरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

जवळा : प्रतिनिधी

१५ ऑगस्ट रोजी जवळा येथील इरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. निसर्गानेही रिमझिम पावसाची साथ देत या सोहळ्याचे सौंदर्य अधिक खुलवले.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे संस्थापक संदीप सालके यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. प्रमुख पाहुण्यांसह मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होता. अध्यक्षस्थानी सोनाली सालके मॅडम होत्या. त्यांनी राष्ट्रभाषेतून सर्वांना शुभेच्छा देत स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व पटवून सांगितले तसेच पालकांनी आजवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

आपल्या वाढदिवसानिमित्त संस्थापक संदीप सालके यांनी विद्यालयास तीन इंटरॅक्टिव्ह बोर्ड भेट दिले. विद्यार्थ्यांचे शिक्षण आनंदी व हसत खेळत व्हावे, तसेच तंत्रज्ञानाची जोड लाभावी या उद्देशाने ही भेट दिल्याचे त्यांनी सांगितले.

उद्योजक प्रकाश शेळके यांनी मुलांना खाऊ दिला, तर पालक मयुर लंके यांनी वृक्ष भेट देऊन हरित उपक्रमाला हातभार लावला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी छाया मॅडम, मणियार मॅडम, श्रुतिका मॅडम, जाधव मॅडम, वैशाली मॅडम, शिर्के मॅडम, चोरमले मॅडम, टोणगे मॅडम, हिना मॅडम यांच्यासह खुपटे मामा, गोपाळे मामा, तोफीक मामा, झरेकर मामा, जाधव मामा व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### मेरा रंग दे बसंती

*विद्यार्थ्यांच्या भाषणांबरोबरच देशभक्तीपर गीतांनी वातावरण भारून गेले. मेरा रंग दे बसंती या नृत्यप्रस्तुतीने प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी ऑलिंपियाड तसेच राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना मेडल, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.*

(पान १ वरून)

### भाजपात निष्ठेची उपेक्षा !

लोकांना संधी मिळाल्याने कार्यकर्त्यांत संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर ही जिल्हा कार्यकारणी तातडीने बरखास्त करावी अशी मागणी निष्ठावंत कार्यकर्त्यांनी थेट प्रदेशाध्यक्षांकडे केली आहे.

#### न्यायालयात जाण्याची चेतावणी

या अन्यायाविरोधात प्रा. सुनील मोहनराव पाखरे, नवनाथ भारतराव गर्जे , युसूफ उस्मानगणी शेख यांनी थेट इशारा दिला आहे की, या कार्यकारणीचे तातडीने शुध्दीकरण झाले नाही तर, आम्ही छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात धाव घेऊन न्याय मिळवू.

#### राष्ट्रीय नेतृत्वालाही माहिती

निवेदनाची प्रत केवळ प्रदेशाध्यक्षांपुरती मर्यादित न ठेवता थेट भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्षांनाही पाठविण्यात आली आहे. त्यामुळे हा वाद राज्यापुरता न राहता केंद्रापर्यंत पोहचण्याची चिन्हे आहेत. भाजपच्या जिल्हा कार्यकारणीतील या गोंधळामुळे कार्यकर्त्यांमधील जुना-नवा संघर्ष आता चव्हाटयावर आला आहे. पुढे प्रदेश नेतृत्व काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

### भारतीय कांदा बांगलादेशला जाणार

सुरुवात केली असून पहिल्या टप्प्यात केवळ २०० मेट्रिक टन कांद्याच्या आयातीला परवानगी दिली आहे. ही निर्यात नंतर टप्प्याटप्प्याने वाढविण्यात येणार आहे.

भारतातील उत्पादनाचा विचार करता किमान पाच लाख मेट्रिक टन कांद्याची निर्यात होणे आवश्यक असल्याचे मत शेतकरी संघटना व निर्यातदारांनी व्यक्त केले आहे. मात्र, केंद्र सरकारने भारतीय निर्यातदारांना प्रोत्साहन दिल्याशिवाय कांद्याच्या भावात मोठी सुधारणा होण्याची शक्यता कमी असल्याचे जाणकारांचे मत आहे.

### हिवरेबाजारने घातला..

याच परंपरेला साजेसा उपक्रम स्वातंत्र्य दिन, संत ज्ञानेश्वर महाराजांची सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती या त्रिसंधीच्या औचित्याने हिवरे बाजारमध्ये पालकमंत्री राधाकृष्ण विखे व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी बोलताना विखे म्हणाले, संतांच्या विचारांचा अंगीकार करून ग्रामविकास, जलसंधारण आणि वृक्षसंवर्धनाच्या वाटेवर सातत्याने वाटचाल करणे ही हिवरे बाजारची खरी ताकद आहे. गावामध्ये एक वृक्ष मातेसाठी, एक वृक्ष देशासाठी या अभियानांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाचा शुभारंभ मंत्री विखे यांच्या हस्ते ग्रामस्थांच्या उत्स्फुर्त सहभागात झाला.

ग्रामस्थांच्या वतीने मंत्री विखे यांचा पारंपारिक पध्दतीने सत्कार कण्यात आला. गावातील महिला, युवक, विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून कार्यक्रम रंगतदार केला. याप्रसंगी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, अनिल मोहिते, विश्वनाथ कोरडे तसेच सरपंच विमलताई ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे, उपाध्यक्ष रामभाऊ चत्तर, दामोदर ठाणगे, अर्जुन पवार, बबन पाटील, लक्ष्मण पवार, विठ्ठल ठाणगे, अन्शाबापू ठाणगे, अशोक गोहड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

#### गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

*कार्यक्रमात यशवंत माध्यमिक विद्यालयातील मार्च २०२५ मध्ये एस.एस.सी. परीक्षेत उज्वल यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मंत्री विखे यांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थ्यांनी एन.सी.सी.संचलन करून पाहुण्यांचे स्वागत केले. यामुळे कार्यक्रमाला शैक्षणिक आणि देशभक्तीपूर्ण वातावरण लाभले.*

# किसान शैक्षणिक संकुलात देशभक्तीचा ज्वर!

## पावसाच्या सरींमध्येही स्वातंत्र्य दिनाचा जल्लोष !

## कवायती, गीत, नृत्यांनी रंगला देशभक्तीचा सोहळा

पारनेर : प्रतिनिधी

**तालुक्यातील पहिल्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या किसान शैक्षणिक संकुलामध्ये देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी आकाशात ढग दाटून आले होते आणि हलक्या सरी कोसळत होत्या, मात्र पावसाच्या या सरींनी विद्यार्थ्यांना उत्साह अजिबात कमी झाला नाही. हाती तिरंगा घेऊन, वेशभूषा परिधान करून, टपो– या डोळयांत चमक घेऊन सर्वजण उत्सवात सहभागी झाले होते.**

याप्रसंगी प्राचार्य मनोज राठोड, उद्योजक ऋषिकेश चेडे, कुणाल पोटे, किशोर शहाणे यांच्यासह पालक, शहरातील नागरिक आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. स्वाती निमसे व अनुसया बोरूडे यांनी सुत्रसंचलन तर आरती औटी यांनी आभार मानले.



### ध्वजारोहण

*कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रीय गीताच्या सुरांमध्ये झाली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार संजय वाघमारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भारत माता की जय आणि वंदे मातरमच्या घोषणा देत उपस्थितांसह देशभक्तीचा गजर केला. फडकणाऱ्या तिरंग्याकडे पाहत अनेकांच्या डोळयांत अभिमानाचे आणि भावनांचे अश्रू तरळले.*

### अतिथींची प्रेरणादायी भाषणे

*अध्यक्ष चंद्रकांत चेडे यांनी विद्यार्थ्यांच्या देशप्रेमाची प्रशंसा करत पावसाच्या सरींमध्येही तुमचा उत्साह कमी झाला नाही, हीच खरी देशभक्ती असल्याचे सांगितले. तर ज्येष्ठ पत्रकार संजय वाघमारे यांनी तुमच्या पावलांतून, तुमच्या गीतांतून आणि तुमच्या भावनांतूर देशप्रेम ओसंडून वाहत असल्याचे गौरवोद्गार काढले.*

### कवायत व परेड मुख्य आकर्षण

*हर घर तिरंगा अभियानाचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनी सादर केलेली कवायत व परेड हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. पावसाच्या रिमझिम सरींमध्येही विद्यार्थ्यांच्या ताठ मानेच्या पावलांनी परिसर भारावून गेला. प्रत्येक पाऊल, प्रत्येक ताळमेळ देशप्रेमाची जाणीव करून देणारा होता.*

### देशभक्तीमय सजावट

*कार्यक्रमाच्या ठिकाणी केलेली सजावटही तितकीच लक्षवेधी ठरली. रंगीबेरंगी फुगे, तिरंगी फुलांच्या माळा, राष्ट्रीय ध्वजाच्या लडी आणि रात्रीसाठी केलेली दिव्यांची रोषणाई यामुळे संपूर्ण परिसरात सणासुदीचा माहोल निर्माण झाला. या सुंदर सजावटीचे सौंदर्य पाहून उपस्थितांनी मोबाईलमध्ये क्षण कैद करण्याची संधी सोडली नाही.*

### सांस्कृतिक कार्यक्रमात देशप्रेमाचा ओघ

*कवायतीनंतर रंगमंचावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली देशभक्तीपर गीते, जोशपूर्ण भाषणे आणि साजेश्या वेशभूषेत सादर केलेले नृत्यप्रयोग यामुळे उपस्थितांची मने भारावली. ऐ मेरे वतन के लोगो यांसारख्या गीतांवर अनेकांचे डोळे पाणावले. काही लहान मुलांनी सैनिकांच्या वेशात केलेली भूमिका आणि मातृभूमीवर आधारित नाट्यछटा प्रेक्षांच्या मनाला भिडली.*

# माळवाडीत भूमिगत गटार योजनेचे भूमिपूजन

## स्वातंत्र्य दिनाच्या औचित्यावर ग्रामविकासाला चालना

भाळवणी : प्रतिनिधी

**स्वातंत्र्य दिनाच्या औचित्यावर भाळवणी येथील माळवाडीत पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून सुमारे पाच लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असलेल्या भूमिगत गटार योजनेचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात पार पडले. योजनेच्या पूर्णत्वानंतर माळवाडी परिसरातील स्वच्छता व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा होणार असून नागरिकांना अधिक आरोग्यदायी वातावरण लाभणार आहे.**

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विकास उर्फ बंडूशेठ रोहोकले उपस्थित होते. यावेळी सरपंच लिलाबाई रोहोकले, उपसरपंच आप्पादादा रोहोकले, खरेदी विक्री संघाचे माजी उपाध्यक्ष गंगाराम भानुदास रोहोकले, सोसायटी चेअरमन झुंबरअण्णा रोहोकले, सोसायटी व्हाईस चेअरमन गोरखदादा रोहोकले, ग्रामपंचायत सदस्य रमेश रोहोकले, तुषार रोहोकले, युवराज रोहोकले, ताराबाई रोहोकले, सविता रोकडे तसेच भाळवणी माळवाडीतील सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

सरपंच लिलाबाई रोहोकले म्हणाल्या, ग्रामपंचायतीच्या प्रयत्नांना शासनाचा प्रतिसाद मिळाल्याने ही योजना हाती घेता आली. योजनेच्या पूर्णत्वानंतर माळवाडीतील आरोग्य आणि स्वच्छता सुधारेल. ग्रामस्थांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्थानिक विकासासाठी सक्रिय सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

### ग्रामस्थांच्या मागणीला प्रतिसाद

*भूमिगत गटार योजना राबविण्याची माळवाडी ग्रामस्थांची मागणी होती. ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन ही योजना सुरु केली आहे. यामुळे घराघरातील सांडपाणी व्यवस्थापन सुकर होईल आणि स्वच्छतेमुळे आजारपणही कमी होतील.*

**– तुषार रोहोकले,** *ग्रामपंचायत सदस्य*

# गणेश शेळके झाले चेअरमन !

## नारायणगव्हाण सोसायटीची पदाधिकारी निवड ; संजय शेळके व्हाईस चेअरमन

नारायणगव्हाण : प्रतिनिधी

नारायणगव्हाण विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी अहिल्यानगर खरेदी विक्री संघाचे संचालक गणेश विक्रम शेळके यांची बिनविरोध निवड झाली. व्हाईस चेअरमन म्हणून संजय बजाबा शेळके यांना संधी देण्यात आली.

सहाय्यक निबंधक विकास जाधव यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली निवड प्रक्रिया सुरळीत पार पडली. यावेळी माजी सरपंच सुरेश बोऱ्हुडे, विद्यमान चेअरमन बाळासाहेब चव्हाण, मा. चेअरमन काशिनाथ नवले, दादासाहेब शेळके, बबनराव शेळके, लक्ष्मण कांडेकर, रत्नमाला खोले, वैशाली शेळके, सचिव गाडेकर, शेखर शेळके, अजित वाघमारे, शिवाजीराव भोसले व मान्यवर उपस्थित होते.



### नव्या पदाधिकाऱ्यांची भूमिका

*सदस्यांच्या हिताला प्राधान्य देत पारदर्शक व परिणामकारक कामकाज करणार आहोत.शेती, पाणीपुरवठा, कर्जवाटप, बचत योजना या सर्व क्षेत्रात सोसायटीची क्षमता वाढवण्यावर भर देऊ. ग्रामस्थांचा विश्वास हेच आमचे सर्वात मोठे भांडवल असल्याचे चेअरमन गणेश शेळके यांनी सांगितले तर व्हाईस चेअरमन संजय शेळके यांनी ग्रामस्थांचे आभार मानून सांगितले की, सोसायटीचा विकास हा केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक प्रगतीलाही गती देणारा ठरेल. एकत्रित काम करून गावाला आदर्श बनविण्याचा निर्धार त्यांनी केला.*

शेळके द्वयींच्या निवडीनंतर राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे, मा. खासदार डॉ. सुजय विखे, विश्वनाथ कोरडे, राहुल पाटील शिंदे यांनी अभिनंदन केले.

या निवडीनंतर गावामध्ये अनेक मान्यवरांनी त्यांचा सन्मान करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. नव्या दमाच्या नेतृत्वाखाली सेवा संस्थेचे काम होणार असून त्यांच्याकडून निश्चितच आदर्श निर्माण केला जाईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# शिव पाणंद रस्त्यांसाठी महामंडळ स्थापन करा

## शरद पवळे यांची सरकारकडे मागणी

सुपा : प्रतिनिधी



**ग्रामीण भागातील शेत व शिव पाणंद रस्त्यांची दयनीय अवस्था लक्षात घेता या रस्त्यांच्या विकासासाठी सरकारने स्वतंत्र शेत व शिव पाणंद शेतरस्ता विकास महामंडळ स्थापन करावे अशी जोरदार मागणी शिवपाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी केली आहे.**

आपल्या मागणीसाठी पवळे यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री यांच्यासह अधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन पाठविले असून राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनीही विशेष ठरावाद्वारे शासनाकडे ही मागणी करण्याचे आवाहन केले आहे.

शेतकऱ्यांचे हाल, रस्त्यांचा अभाव : राज्यातील बहुतांश शेत रस्ते, शिव रस्ते आणि पाणंद रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था असून त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीची अवजारे, बियाणे, खते यांची ने–आण करताना मोठया अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे शेतीसाठी मूलभूत सुविधा देण्यासाठी चांगल्या दर्जाचे रस्ते असणे अत्यंत आवश्यक असल्याचे पवळे यांनी नमूद केले आहे.

### स्वतंत्र महामंडळाची गरज

*शहरांमध्ये बांधकाम विभाग शहरी रस्त्यांसाठी कार्यरत असतो. त्याच धर्तीवर ग्रामीण भागातील शेतीसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करावे, जे शेत व शिवपाणंद रस्त्यांचे नियोजन, आरक्षण, निर्मिती व देखभाल करेल, असे पवळे यांचे म्हणणे आहे. या महामंडळात किमान पाच एकर शेती असणाऱ्या व शेतीची प्रत्यक्ष जाणीव असलेल्या व्यक्तींना सहभागी करून, वास्तवाशी सुसंगत निर्णय घेता येतील, असेही त्यांनी सुचविले आहे.*

### तहसिलदारांच्या अधिकारांची मर्यादा

*सध्या महसूल व वन विभाग या रस्त्यांसंदर्भातील निर्णय घेत असले तरी तहसिलदारांच्या अधिकारांची मर्यादा असल्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही. परिणामी वाद, तंटे, कोर्ट–कचेऱ्या वाढत आहेत. ही समस्या टाळण्यासाठी स्वतंत्र महामंडळाची गरज ठळकपणे जाणवत असल्याचे पवळे यांचे म्हणणे आहे.*

### महामंडळाची संभाव्य कार्ये

*गावागावातील शिव रस्त्यांची ३३ फूट रूंदीने मोजणी व आरक्षण, गावनकाशातील पूर्वीचे रस्ते अतिक्रमणमुक्त करून किमान १६० फुट रूंदीचे करणे, प्रत्येक शेतकऱ्याला खाजगी शेत रस्ता उपलब्ध करून देणे, सातबाऱ्यावर रस्त्याचा हक्क स्पष्टपणे नोंदवणे, पक्क्या स्वरूपाचे रस्ते निर्माण करणे, कायमस्वरूपी देखभाल यंत्रणा उभारणे, रस्त्यांसाठी स्वतंत्र निधीची तरतूद, अतिक्रमणाचा प्रश्न आणि दुर्लक्ष याकडे लक्ष वेधतानाच ब्रिटिशकालीन शिव रस्त्यांची नोंदणी झालेली असूनही, स्वातंत्र्यानंतर त्याची पुन्हा मोजणी न झाल्यामुळे अनेक रस्त्यांवर अतिक्रमण झाले आहे. हे अतिक्रमण स्थानिक शेतकऱ्यांकडूनच झाले असून त्यावर कारवाईसाठी यंत्रणा अपुरी असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.*

# बाळासाहेब माळी शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख ; तालुक्यात गावोगावी शाखा विस्ताराचा निर्धार

पारनेर : प्रतिनिधी

**तालुक्यातील जामगाव येथील बाळासाहेब माळी यांची शिवसेनेच्या (शिंदे गट) जिल्हा उपप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी पत्राद्वारे ही नियुक्ती जाहीर केली.**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा राजीनामा देऊन तालुक्यातील प्रलंबित प्रश्न सोडविण्याच्या हेतूने माळी यांनी दिड महिन्यांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला होता. आता त्यांच्यावर पारनेर कार्यक्षेत्राची जिल्हा उपप्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नियुक्तीपत्र देताना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी सांगितले, माळी यांचे यापूर्वीचे संघटन कौशल्य चांगले असून, पदाच्या माध्यमातून तालुक्यातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ते प्रभावीपणे काम करतील. शहरप्रमुख दिलीप सातपुते म्हणाले की, तालुक्यात गावोगावी शाखा स्थापन करून पदाधिकारी निवड प्रक्रिया वेगाने राबवावी. यावेळी मारुती रोहोकले,साहेबराव खरमाळे,संपत रोहोकले, बाळासाहेब शिंदे,चंद्रकांत नांगरे, मनोज शिंदे,विलास कोरडे,चेतन खाडे,दिनकर सोबले उपस्थित होते.



### संघटन वाढीसाठी प्रयत्नशील

*उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन मी शिवसेनेत प्रवेश केला. जिल्हा उपप्रमुख पदाची जबाबदारी मिळाल्याने ही माझ्यासाठी सन्मानाची आणि काम करण्याची मोठी संधी आहे. आगामी काळात 'गाव तिथे शाखा' हे ब्रीद घेऊन तालुक्यातील प्रत्येक गावात संघटन विस्तार करणार आहे. स्थानिक समस्यांचे त्वरित निराकरण, पदाधिकाऱ्यांची निवड आणि जनतेशी थेट संपर्क हेच माझे प्राधान्य असेल. तालुक्यात शिवसेनेची ताकद वाढविण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करणार आहे.*

**– बाळासाहेब माळी,** जिल्हा उपप्रमुख, शिवसेना

# पाडळी रांजणगांव उजाळणार !

## वाडया–वस्त्यांना सिंगल फेज वीज पुरवठा

सुपा : प्रतिनिधी



**पाडळी रांजणगांव गावाल दीर्घकाळ प्रलंबित असलेली सिंगल फेज वीजपुरवठ्याची मागणी अखेर पुर्ण झाली असून गावठाणासह वाडया–वस्त्या दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघणार आहे.**

### वीजेवाचून अडचण

गावठाणाचा अपवाद वगळता वाड्या–वस्त्या अनेक वर्षांपासून सिंगल फेज वीज पुरवठ्यापासून वंचित होत्या. त्यामुळे दूध काढणी मशीन, घरगुती उपकरणे, पाणी पंपींग यंत्रणा आदी साधणे वापरणे कठीण जात होते. विशेषतः साठे मळा,कालिकानगर, साकळाई मळा, राहुल उबाळे वस्ती, मांजर ओढा वस्ती, आबाईदरा वस्ती, औटी वस्ती, कळमकरवाडी, तळेवाडी, चिंतामण करंजुले वस्ती या भागातील रहिवासी वीजेच्या समस्येने त्रस्त होते.

### ग्रामपंचायतचे अथक प्रयत्न

*सरपंच विक्रमसिंह कळमकर आणि चेअरमन डी.बी. करंजुले यांनी ग्रामपंचायतच्या माध्यमतून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी अथक प्रयत्न केले. केंद्र शासनाच्या आर.डी. एस.एस. योजनेत गावाचा समावेश करण्यासाठी जिल्हा प्रशासन, वीज वितरण कंपनी आणि लोकप्रतिनिधींशी अनेकदा बैठका घेण्यात आल्या. योजनेस मंजुरी मिळूनही तांत्रिक व प्रशासकीय कारणामुळे या कामाला विलंब होत होता.*

### पालकमंत्री,आमदारांचा पुढाकार

*ही योजना विलंब न होता माग लागावी म्हणून पालकमंत्री राधाकृष्ण विखे,आमदार काशिनाथ दाते यांनी स्वतः हस्तक्षेप केल्याने आता पहिल्या टप्प्यात साठे मळा,कालिकानगर, साकळाई मळा, राहुल उबाळे वस्ती, मांजर ओढा येथे ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम लवकरच सुरू होणार आहे. डीपीडीसी योजनेतून दुसऱ्या टप्प्यात आबई दरा वस्ती, औटी वस्ती, कळमकरवाडी, तळेवाडी, चिंतामण करंजुले वस्ती येथे २५ केव्हीए क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर व सिंगल फेज योजना मंजुर करण्यात आली आहे.*

# सुर्यासम तेजस्वी, चंदनासम सुगंधी बना !

## ह.भ.प.अशोक महाराज शिंदे यांचा मंत्र ; पारनेर पब्लिक स्कूलमध्ये हर घर तिरंगा अभियानात अध्यात्मिक रंग

पारनेर : प्रतिनिधी

संत ज्ञानेश्वर महाराजांनी जसे चंदन स्वतः थंड राहून इतरांना सुगंध देतो, तसेच आपले जीवन सुर्यासम तेजस्वी, चंदनासम सुगंधी असावे. स्वतः ज्ञानाने समृध्द व्हा आणि ते ज्ञान समाजात पसरवा असा संदेश ह.भ.प. अशोक महाराज शिदे यांनी दिला. ते पारनेर पब्लिक स्कूल एड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे आयोजित प्रवचनात बोलत होते.

कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्याथ मोठया संख्येने उपस्थित होते. सचिन मोढवे यांनी सुत्रसंचलन तर दत्तात्रय काकडे यांनी आभार मानले. प्रवचनानंतर उपस्थित १ हजार विद्यार्थ्यांनी सामूहिक पसायदान गायले. या क्षणी वातावरण भक्ती, एकता आणि संस्कारांच्या भावनेने भारून गेले होते.



### हर घर तिरंगा अभियानात अध्यात्मिक रंग

*आजादी का अमृत महोत्सवांतर्गत राज्यात २ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा अभियान राबवले जात आहे. या पार्श्वभूमीवर विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १४ ऑगस्ट रोजी पुण्याच्या शिक्षण आयुक्तालयाच्या सुचनेनुसार संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या सप्तशतकोत्तर सुवर्ण जयंती वर्षानिमित्त सामूहिक पसायदान व निरूपणाचा कार्यक्रम पार पडला.*

### ज्ञानोबांचे तत्वज्ञान आजही लागू

*विद्यालयाचे प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की, ज्ञानोबांनी पसायदानातून दिलेला संदेश वाईटाची संगत टाळावी, दानशीलता जोपासावी आणि ज्ञानदानाला सर्वोच्च मानावे असा आहे. आजच्या पिढीने हे आचरणात आणणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.*

### ज्ञानेश्वरीतील जीवनमूल्य उलगडली

*ह.भ.प.अशोक महाराज शिंदे यांनी आपल्या प्रवचनातून संत ज्ञानेश्वरांच्या जीवनातील प्रसंग, भगवद्गीतेचे मराठी भाषांतर म्हणजेच ज्ञानेश्वरी मागील हेतू आणि त्या ग्रंथातील तत्वज्ञान उलगडून सांगितले. त्यांनी सांगितले, चांगली संगत ठेवा आणि मित्रत्वचा भाव जपा, इतरांच्या हितासाठी जगा, पालक व गुरूजनांचा सन्मान करा, ज्ञानाची भूक कायम ठेवा, माणुसकीसोबत प्राणिमात्रांची सेवा करा. सुर्यासारखे तेजस्वी आणि चंदनासारखे सुगंधी बना हेच संत ज्ञानेश्वरांचे तत्वज्ञान आहे,जे काळाच्या ओघात कधीही जुनं होणार नाही असे शिंदे महाराज म्हणाले.*